---

**JALYUKTA SHIVAR ABHIYAN AT KALEWADI (DIVE) TAL: PURANDHAR, DIST: PUNE**

# काळेवाडीत बंधाऱ्यातील गाळ काढण्यास प्रारंभ

## भारत फोर्ज कंपनीचे साह्य; परिसरातील विहिरींना फायदा

**गराडे, ता. ६ :** जलयुक्त शिवार अभियानाद्वारे गावची पाण्याची समस्या गावातच सोडविली जाणार आहे. मात्र, या अभियानात लोकसहभाग महत्त्वाचा आहे, असे मत भारत फोर्जच्या शिवस्पर्श विभागाचे समन्वयक चंद्रशेखर वाळके यांनी सांगितले.

काळेवाडी (ता. पुरंदर) येथील चरणावती ओढ्यावरील म्हसोबाच्या बंधाऱ्यातील गाळ काढण्याच्या कामाचा प्रारंभ वाळके यांच्या हस्ते करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या कामासाठी भारत फोर्ज कंपनीने साहाय्य केले आहे.

या वेळी भारत फोर्जच्या शिवस्पर्श विभागाचे अमोल शिंदे, बाजीराव खताळ, दीपक कुटे, अमोल नाळे, संदीप तेलतुंबडे, राजाराम काळे, बाळासाहेब काळे, पंढरीनाथ काळे, भानुदास काळे, उमेश झेंडे, प्रदीप जगदाळे, किसन काळे, शंकर काळे, हर्षद चव्हाण, संदीप काळे आदी उपस्थित होते. हभप शिवाजीराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू करण्यात आले आहे. या बंधाऱ्यातून ३ हजार घनमीटर गाळ काढण्यात येणार आहे. त्याचा फायदा परिसरातील बारा विहिरींना होणार आहे, असे सागर काळे यांनी सांगितले.




काळेवाडी (ता. पुरंदर) : बंधाऱ्यातील गाळ काढण्याचा प्रारंभ करताना भारत फोर्जच्या सामाजिक दायित्व विभागाचे समन्वयक चंद्रशेखर वाळके (उजवीकडून सहावे).

**Source: Sakal News Paper on dated 7th May, 2015 (Page No. 6)**

---

**JALYUKTA SHIVAR ABHIYAN AT KALEWADI (DIVE), TAL: PURANDHAR, DIST: PUNE**

# काळेवाडी बंधाऱ्यासाठी भारत फोर्जतर्फे निधी

**गराडे, ता. २२ :** काळेवाडी (ता. पुरंदर) येथे जलयुक्त शिवार मोहिमेंतर्गत येथील चरणावती ओढ्यावरील म्हसोबाच्या बंधाऱ्यातील गाळ कल्याणी ग्रुप व भारत फोर्जच्या शिवस्पर्श विभागाच्या वतीने काढण्यात येत आहे.

या कामाची पाहणी कंपनीच्या विभागप्रमुख लीना देशपांडे यांनी केली. त्यांनी आणखी दीड लाखांचा निधी मंजूर केला. भारत फोर्जच्या सामाजिक दायित्व विभागाचे समन्वयक चंद्रशेखर वाळके, अमोल शिंदे, वाजीराव खळाळ, दीपक कुटे, अमोल नाळे, संदीप तेलतुंबडे यांनी या बंधाऱ्याच्या कामाचे नेतृत्व केले. अमित काळे, पंढरीनाथ काळे, कृषी अधिकारी अनिल पाटील, दत्ता काळे, बाळासाहेब जाधव आदी उपस्थित होते. शिवाजीराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम गावात सुरू झाले. प्रास्ताविक स्वागताचा काळे यांनी केले.